मराठी

# अक्षरभारती

इयत्ता दहावी



# भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २९.१२.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## मराठी

# अक्षरभारती

## इयत्ता दहावी

### (द्‌वितीय भाषा)



9K5HTY

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्‌वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्‌वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्‌वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१८
तिसरे पुनर्मुद्रण : २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती**

फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्री. शिवाजी तांबे (सदस्य)
डॉ. सुजाता महाजन (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य-सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

| | | |
|---|---|---|
| श्रीमती स्वाती ताडफळे | प्रा. विजय राठोड | श्रीमती नेहा रावते |
| डॉ. नंदा भोर | श्री. देविदास तारू | श्रीमती अन्वया काणे |
| डॉ. शारदा निवाते | श्रीमती प्रांजली जोशी | श्रीमती सुप्रिया खाडिलकर |
| श्रीमती अनुजा चव्हाण | श्रीमती वैदेही तारे | श्री. सुनिल बनसोडे |
| श्री. मोहन शिरसाट | डॉ. सुभाष राठोड | डॉ. जगदीश पाटील |
| श्री. प्रवीण खैरे | श्री. नाना लहाने | श्री. रमाकांत देशपांडे |
| श्री. प्रमोद डोंबे | श्रीमती प्रतिभा लोखंडे | श्री. नामदेव एडके |
| श्री. समाधान शिकेतोड | श्रीमती जयमाला मुळीक | श्री. रविंद्रदादा डोंगरदेव |
| श्री. बापू शिरसाठ | डॉ. मंजूषा सावरकर | श्री. दिलीप देशपांडे |
| श्री. मयुर लहाने | श्रीमती स्मिता जोशी | |

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ, विशेषाधिकारी, मराठी
**चित्रकार** : फारुख नदाफ
**मुखपृष्ठ** : फारुख नदाफ
**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.
**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी
राजेंद्र पांडलोसकर, सहायक निर्मिती अधिकारी
**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह
**मुद्रणादेश** : N/PB/2021-22/1.00
**मुद्रक** : M/s. Hitech Graphics, Panvel

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**

दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी **बंधुता** प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत** आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी **याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता दहावीचे 'अक्षरभारती' मराठी हे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आनंद होत आहे.

मित्रांनो! तुम्हांला मराठीतून एकमेकांशी चांगल्या प्रकारे संवाद साधता यायला हवा. आपले विचार, भावना, कल्पना लेखनातून अभिव्यक्त करता यायला हव्यात. यासाठी मराठी भाषा चांगल्या प्रकारे शिकून उत्तम प्रकारे वापरता यायला हवी, हे विचारात घेऊन या पाठ्यपुस्तकातील पाठांची, स्वाध्यायांची योजना केलेली आहे.

पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीला क्षमतांची यादी दिलेली आहे. त्यावरून कोणती भाषिक कौशल्ये आत्मसात करायची आहेत याची तुम्हांला कल्पना येऊ शकेल.

या पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगात डोकावल्यावर तुमच्या लक्षात येईल, की त्यामध्ये विविध साहित्यप्रकारांचा समावेश केलेला आहे. गद्य पाठांमध्ये कथा, ललित, विनोदी शैलीतील पाठ, विज्ञान विषयावरील पाठ इत्यादी प्रकारच्या पाठांचा समावेश केला आहे. तसेच पद्य पाठांमध्ये प्रार्थना, संतवाणी, देशभक्तीपर गीत, निसर्गवर्णनपर कविता इत्यादी काव्यप्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. या सर्व पाठांमधील आशय आणि भाषा यांमधील वैविध्य तुम्हांला नक्कीच आवडेल.

या पाठ्यपुस्तकाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक पाठाखालील स्वाध्यायांचे स्वरूप आणि रचना वैविध्य. हे स्वाध्याय तुम्हांला पाठांचे अंतरंग समजून घेण्यास मदत करतील. तुमची आकलनशक्ती, विचारशक्ती, कल्पनाशक्ती आणि सृजनशीलता विकसित करण्याच्या हेतूने स्वाध्यायांतील कृतींची रचना जाणीवपूर्वक केली आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि तुमचे स्वयंअध्ययन यांमधून भाषा शिकताना तुम्हांला अभ्यासाचे ओझे वाटणार नाही. पाठांतराचे दडपणही राहणार नाही.

दैनंदिन व्यवहारात आपणाला पावलोपावली मराठी भाषेचा वापर करावा लागतो. त्या दृष्टीने तुमची उत्तम तयारी व्हावी, यासाठी या पाठ्यपुस्तकातील उपयोजित लेखनाचा सराव उपयुक्त ठरेल. त्याचबरोबर रोजच्या व्यवहारांमध्ये तुम्हांला तंत्रज्ञानाचाही वापर करायचा आहे. त्यासाठी पाठ्यघटकांशी संबंधित अधिक माहिती मिळवण्यासाठी संकेतस्थळांची यादीही दिलेली आहे. प्रत्येक पाठासंबंधी अधिक माहिती मिळवण्यासाठी ॲपच्या माध्यमातून क्यू. आर. कोडद्वारे उपयुक्त दृकश्राव्य साहित्य आपणांस उपलब्ध होईल. त्याचा तुम्हांला अभ्यासासाठी निश्चितच उपयोग होईल.

भाषिक विकासाबरोबरच विचारक्षमता, अभिव्यक्ती कौशल्ये आणि सृजनशीलता यांच्या विकासासाठी उपयुक्त ठरू शकणारे हे पाठ्यपुस्तक तुम्हांला नक्कीच आवडेल, असा विश्वास आहे.

**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : १८ मार्च २०१८, गुढीपाडवा
भारतीय सौर : २७ फाल्गुन १९३९

# भाषाविषयक क्षमता : द्‌वितीय भाषा मराठी

**इयत्ता दहावीच्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये भाषाविषयक पुढील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.**

| क्षेत्र | क्षमता |
|---|---|
| श्रवण | १. विविध प्रसारमाध्यमांद्‌वारे प्रसारित होणाऱ्या चर्चा, संवाद यांबाबत स्वत:चे मत निश्चित करता येणे.<br>२. सार्वजनिक ठिकाणी ऐकलेल्या सूचनांनुसार आपल्याशी संबंधित असलेल्या सूचना लक्षात घेणे.<br>३. औपचारिक व अनौपचारिक संवाद, संभाषण ऐकून त्यात सक्रिय सहभाग घेता येणे.<br>४. विविध प्रकारच्या साहित्यातील भावार्थ समजून घेता येणे.<br>५. विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती ऐकून त्यातील स्वराघात, आरोह-अवरोह या वैशिष्ट्यांची जाण होणे.<br>६. विविध साहित्यप्रकार ऐकून त्याबाबत मत ठरवता येणे. |
| भाषण-संभाषण | १. विविध पद्यप्रकारांना चाली लावून त्यांचे सादरीकरण करता येणे.<br>२. विषयानुरूप स्वत:चे स्वतंत्र विचार परखडपणे मांडता येणे.<br>३. विविध उपक्रमांचे नियोजन, आयोजन करून त्यात सक्रिय सहभाग घेता येणे.<br>४. भाषण-संभाषण कौशल्यातील बारकावे समजून घेऊन त्याचा योग्य वापर करता येणे.<br>५. प्रसंगानुरूप समोरील व्यक्तीशी संवाद साधून स्वत:चे मत प्रभावीपणे मांडता येणे. |
| वाचन | १. पाठ्यपुस्तक व पाठ्येतर इतर साहित्याचे समजपूर्वक प्रकट वाचन करता येणे.<br>२. विरामचिन्हांची दखल घेऊन अर्थपूर्ण प्रकट वाचन करता येणे.<br>३. दिलेल्या उताऱ्याच्या आशयाची मध्यवर्ती कल्पना, सारांश, विचार समजून घेऊन लेखन करता येणे.<br>४. विविध साहित्यप्रकारांचे समजपूर्वक वाचन करून त्यांचा आस्वाद घेता येणे.<br>५. आंतरजालावर उपलब्ध असलेल्या संकेतस्थळांवरील माहितीचे वाचन करता येणे.<br>६. सार्वजनिक ठिकाणी लिहिलेल्या सूचना व माहिती समजपूर्वक वाचून त्याबाबत योग्य विचार करता येणे. |
| लेखन | १. लेखन करताना शुद्‌धलेखनाच्या नियमांचे पालन करता येणे.<br>२. वाचलेल्या साहित्याच्या आशयातील मध्यवर्ती विचारांचे लेखन करता येणे.<br>३. दिलेल्या विषयामध्ये स्वत:च्या विचारांची भर घालून पुनर्लेखन करता येणे.<br>४. म्हणी, वाक्प्रचार, शब्द व शब्दसमूह, आलंकारिक शब्द, सुभाषिते यांचा लेखनात उपयोग करता येणे.<br>५. सामाजिक प्रश्नांवर अभ्यासपूर्ण लेखन करता येणे.<br>६. घटना, प्रसंग, स्वानुभव यांचे तुलनात्मक लेखन करता येणे.<br>७. ऐकलेल्या, अनुभवलेल्या माहितीचे स्वत:च्या शब्दांत लेखन करता येणे.<br>८. पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या उपयोजित लेखन घटकांवर लेखन करता येणे. |

**अध्ययन कौशल्य**

१. संदर्भासाठी शब्दकोश पाहता येणे.
२. दिलेल्या विषयाचा सखोल अभ्यास करून स्वमत मांडता येणे.
३. घटना, प्रसंग, कार्यक्रम यांबाबत अभिप्राय मांडता येणे.
४. शब्दसमूह, वाक्प्रचार, म्हणी यांचा लेखनात व भाषण-संभाषणात प्रभावीपणे वापर करता येणे.
५.आंतरजालाचा वापर करून ऑनलाइन व्यवहार करता येणे. तसेच सोशल मीडियाचा योग्य वापर करता येणे.
६. संगणकावर उपलब्ध असणाऱ्या विविध शैक्षणिक ॲप्लिकेशन्सचा अभ्यासासाठी वापर करता येणे.
७. प्रसारमाध्यमांद्वारे उपलब्ध होणाऱ्या कलाकृतींचा आस्वाद घेता येणे, त्याबाबत चिकित्सक विचार करता येणे.
८. विविध सामाजिक समस्यांबाबत आपले मत परखडपणे मांडता येणे.

**भाषाभ्यास**

१. इयत्ता नववीपर्यंत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी करणे.
लिंग, वचन, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, वाक्प्रचार, प्रत्यय व उपसर्ग, शब्दांच्या जाती, विरामचिन्हे, सामान्यरूप, अव्ययीभाव व द्वंद्व समास, उपमा व उत्प्रेक्षा अलंकार, शब्दसंपत्ती, लेखनविषयक नियम इत्यादी.
२. रसविचार, वाक्यरूपांतर.

## शिक्षकांसाठी

मराठी अक्षरभारती (द्वितीय भाषा) इयत्ता दहावीचे हे पाठ्यपुस्तक अध्ययन-अध्यापनासाठी आपणांस देताना अतिशय आनंद होत आहे. विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी संबंधित पाठ, कविता, कृती (स्वाध्याय) व आशयानुरूप चित्रे यांसारख्या अनेक घटकांचा समावेश केलेला आहे. शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या भाषाविषयक क्षमतांचा विचार करून विद्यार्थ्यांमधील भाषिक क्षमता विकसित होण्यासाठी पाठ्यपुस्तकातील कृतींबरोबरच इतर विविध कृती व उपक्रम योजून ते विद्यार्थ्यांकडून करवून घ्यावेत.

क्षमता क्षेत्रातील भाषाभ्यास या शीर्षकाखाली दिलेल्या सर्व व्याकरण घटकांची उजळणी शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून करून घेणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकामध्ये इयत्ता नववीपर्यंत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी होण्यासाठी विविध कृती योजलेल्या आहेत. व्याकरण घटकांची व कृतींची मांडणी मनोरंजक व सोप्या पद्धतीने केली आहे. कृतिपत्रिकेमध्ये या व्याकरण घटकांवर आधारित कृतींचा समावेश केला जाणार आहे. शिक्षकांनी स्वत: या व्याकरण घटकांच्या सरावासाठी विविध कृती योजाव्यात व त्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात.

उपयोजित लेखन या विभागामध्ये विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्य विकासासाठी घटकनिहाय विविध कृती व त्यांचे नमुने दिलेले आहेत. या वैविध्यपूर्ण कृतींमधून विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्ये विकसित होणार आहेत. इयत्ता दहावीतील उपयोजित लेखन घटकांची मांडणी इयत्ता नववीतील उपयोजित लेखन घटकांचा विचार करून केली आहे, त्यामुळे शिक्षकांनी इयत्ता नववीतील उपयोजित लेखन घटकांचाही आढावा घ्यावा.

शिक्षकांनी स्वत:च्या सृजनशीलतेने, कल्पकतेने विविध भाषिक कृतींची रचना करावी, त्याचबरोबर अशा विविध कृती तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांनाही प्रेरित करावे. त्यातून विद्यार्थ्यांची निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतिशीलता यांनाही संधी मिळणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांचा वापर करून अध्यापनात अधिकाधिक संदर्भ देणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकातील गद्य व पद्य पाठांमधील कठीण शब्दांचे अर्थ पाठांच्या शेवटी दिलेले आहेत. शिक्षकांनी आवश्यकतेनुसार पाठांतील इतर शब्दांचे अर्थ समजून घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करावा, तसेच विद्यार्थ्यांना संदर्भ म्हणून शब्दकोश पाहण्यासाठी प्रेरित करावे.

मराठी अक्षरभारती (द्वितीय भाषा) इयत्ता दहावीचे हे पाठ्यपुस्तक तुम्हांला नक्कीच आवडेल, अशी आशा आहे.

# अनुक्रमणिका

## भाग – १


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | तू बुद्धी दे (प्रार्थना)<br>– गुरू ठाकूर | १ |
| २. | संतवाणी–<br>(अ) अंकिला मी दास तुझा–संत नामदेव<br>(आ) योगी सर्वकाळ सुखदाता–संत एकनाथ | २ |
| ३. | शाल<br>– रा. ग. जाधव | ७ |
| ४. | उपास<br>– पु. ल. देशपांडे | १० |
| ❖ | मोठे होत असलेल्या मुलांनो...<br>(स्थूलवाचन)<br>– डॉ. अनिल काकोडकर | १५ |


## भाग – २


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ५. | दोन दिवस (कविता)<br>– नारायण सुर्वे | १७ |
| ६. | चुडीवाला<br>– जयश्री रुईकर | १९ |
| ७. | फूटप्रिन्टस<br>– डॉ. प्रदीप आवटे | २३ |
| ८. | ऊर्जाशक्तीचा जागर<br>– डॉ. रघुनाथ माशेलकर | २८ |
| ❖ | जाता अस्ताला<br>(स्थूलवाचन)<br>– गुरुदेव रवींद्रनाथ टागोर | ३१ |


## भाग –३


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ९. | औक्षण (कविता)<br>– इंदिरा संत | ३३ |
| १०. | रंग साहित्याचे | ३६ |
| ११. | जंगल डायरी<br>– अतुल धामनकर | ४२ |
| १२. | रंग मजेचे रंग उदयाचे (कविता)<br>– अंजली कुलकर्णी | ४५ |
| ❖ | जगणं कॅक्टसचं<br>(स्थूलवाचन)<br>– वसंत शिरवाडकर | ४७ |


## भाग –४


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १३. | हिरवंगार झाडासारखं (कविता)<br>– जॉर्ज लोपीस | ५० |
| १४. | बीज पेरले गेले<br>– चंदू बोर्डे | ५२ |
| १५. | खरा नागरिक<br>– सुहास बारटक्के | ५५ |
| १६. | स्वप्न करू साकार (कविता)<br>– किशोर पाठक | ५९ |
| ❖ | व्युत्पत्ती कोश<br>(स्थूलवाचन) | ६१ |
| ❖ | उपयोजित लेखन | ६८ |